# ।। ब्रम्ह विचार को अंग ।।
## मारवाडी + मराठी
✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

।। अथ ब्रम्ह बिचार को अंग लिखंते ।।

।। कवत्त ।।

प्रतपाल परवार ।। राम सोई तुज कहावे ।।
अलख अमर जगदीस ।। तुज तोहि कूं गावे ।।
निराकार निरबंध ।। ओर बंधन मे तूंहि ।।
सतसाहेब भगवान ।। आप करता सो होई ।।
तुहि माया तुहि ब्रम्ह हे ।। तु सत्त जीव र सीव ।।
के सुखदेव अब समझियाँ ।। तुम हो नारी पीव ।।१।।

प्रतिपाल करणारा सतस्वरूप ब्रम्हच आहे आणि परिवार ही सतस्वरूप ब्रम्ह तुच आहे.राम ही सतस्वरूप ब्रम्ह तुम्हालाच म्हणतात.अलख आणि अमर तसेच जगदीश इत्यादी म्हणून हे सर्व हे सतस्वरूप ब्रम्ह तुम्हालाच भजतात.निराकार आणि निरबंध सतस्वरूप ब्रम्ह तुच आहे व बंधनात ही तूच आहे.सत साहेब,भगवान,कर्तार हे सर्व,हे ब्रम्ह तुम्ही स्वत:च आहे.तुच माया आहे. तुच ब्रम्ह आहे.तुच जीव आणि शिव तुम्हीच आणि तूच सत म्हणजे नेहमी राहणारा ब्रम्ह आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,आता माझ्या समजमध्ये आले की,तुम्हीच नारी आहात आणि तुम्हीच तिचे पीव म्हणजे पती आहे.।।१।।

निरालंभ निरधार ।। आप आरब अबनासी ।।
तु संकर सिव सेंस ।। तुज बैकुंटाबासी ।।
परजा जगत जिहान ।। पसु पंखी बन सारा ।।
तुं तुं तुहि तुज ।। तुज हे सकळ पसारा ।।
पाँच तत्त तुहि बण्यो ।। ब्रम्हा सगत स्वरूप ।।
के सुखदेव निराकार तूं ।। सब जग हर को रूप ।।२।।

निरालंब आणि निराधार तुम्हीच आहे.आरब(पालनकर्ता)तुम्ही आहे.तुम्ही अविनाशी आहात.तुम्ही शंकर आहात,तुम्ही शिव आणि तुम्ही शेष आणि तुम्ही जहान(सृष्टी)आहे. तुम्ही जगत आहे.सारे पशु तुम्ही आहात आणि सर्व पक्षी ही तुम्ही आहे आणि सारे वन(अठरा भार वनस्पती)ही तुम्ही आहात.सर्व तुम्ही तुम्ही तुम्हीच सतस्वरूप ब्रम्ह आहे. हा सारा पसाराही तुमचाच आहे.पाच तत्व तुम्ही बनले आणि तुम्ही ब्रम्हा बनले आणि तुम्ही शक्तीचे स्वरूप बनलात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की तुम्ही निराकार आहात आणि सारे साकारी जगत हरचे रूप म्हणजे ब्रम्हचे रूप आहे.।।२।।

तूहि दाणु अवतार ।। सार सेवा सो सामी ।।
जख राक्षस जंजाल ।। भूत सीळो तत्त कामी ।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

करणी करता आप ।। जड़ भोळा बिडरूपा ।।
सित अम्बर छाय ।। पंच बेळू सिश धूपा ।।
हर हरि यो करतार हे ।। तां मे मीन न मेख ।।
के सुखदेव चाळो करे ।। तेसा सुख दुख पेख ।।३।।

सर्व राक्षस तुम्ही आहे आणि सर्व अवतार ही तु आहात.स्वामी ही तुम्ही आहे आणि सर्व सार ही तुम्ही आहात.सर्व सेवा ही तुम्ही आहे.यक्ष ही तुम्ही आहेत आणि सारे दानव ही तुम्ही आहात.राव ही तुम्ही आणि सर्व जंजाळ तुम्ही आहात.तुम्ही भूत आहे. तसेच शांत ही तुम्ही आहे.कामी ही तुम्ही तसेच करणी करणारे ही तुम्ही आहे. तत्त(सार ब्रम्ह ही)तुम्ही आहे.जड ही तुम्ही आणि भोळा ही तुम्ही आहेत.बीड रूप ही तुम्ही आहे.थंडी ही तुम्ही आहात.अंबर(आकाश,कपडा)ही तुम्ही आहे.छाया ही तुम्ही आहात आणि पाच तत्व ही तूच आहेस.बालू ही तुम्ही आणि चंद्र ही तुम्ही आहात.ऊन ही तु आहे हर आणि हरी असा कर्तार ही तुम्ही आहात.याचात काही फेरफार नाही. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की जसे हा चाळे म्हणजे कर्म करतो त्याच्या अनुसार दुःख आणि सुख पाहतो.।।३।।

हणुवंत सीत समंद ।। राम रावण सो ओई ।।
कुम्भकरण म्हेराण ।। बाल लछमण संग सोई ।।
भरत बीभषण राव ।। मृग जटायु युध हुवो ।।
लिव कुश सुण सुग्रीव ।। नहिं तो बिन हर जूवो ।।
इत उत तरफां आपही ।। हार जीत तुंही होय ।।
के सुखदेव करतार बिन ।। अवरन दूजो कोय ।।४।।

तु हनुमान आहे आणि तु सीता बनला तसेच समुद्र ही तुम्ही आहात.राम ही तुम्ही बनला आणि रावण ही तुम्ही बनला.कुम्भकर्ण आणि अहिरावण ही तुम्ही बनला.सर्व वानर व लक्ष्मण ही तुम्हीच बनले.हे सर्व संगी(फौज)वानर,भालू सर्व तुम्हीच आहात. मृग,मारीच आणि जटायू तुम्हीच आहात.तुमच्याशी रावणाने युद्ध केले होते.तसेच रावणातही तुम्हीच होते.लव ही तुम्हीच होते कुश ही तुम्हीच होते आणि सुग्रीव ही तुम्हीच होते.तुमच्या शिवाय हर(रामजी)कोणी दुसरा नव्हता.लढाईत इकडे ही तुम्ही आणि तिकडे ही तुम्ही म्हणजे दोन्ही बाजूने तुम्ही स्वयं होते.तुमचीच पराजय झाली आणि विजय ही तुमचीच झाली.तेथे काय आणि येथे काय तुम्हीच होते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की,कर्तार शिवाय आणि दुसरा कोणी नाही.।।४।।

रूकमण राधा किसन ।। कंस वसुदेव कहाणो ।।
पृथु भरत सुखदेव ।। रूम रिष अढळ रहाणो ।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

पीर तिथंकर पाप ।। धर्म आभौ तूं धरणी ।।
मंतर जंतर मान ।। केसो तुं करणी ।।
बरण्या सकळ बभेक ।। जगत जंवरो तुहि जोगी ।।
सुण सुखदेव कहे साचरे ।। तुं बेदंग तुहि रोगी ।।५।।

तुम्हीच रुक्मिणी आणि तुम्हीच राधा होते तसेच कृष्ण ही तुम्हीच म्हणवले.तुम्हीच कंस आणि तुम्हीच वासुदेव म्हणवले.तुम्हीच पृथु(पृथ्वीचे दोहने करणारा)आणि तुम्हीच ऋषभ देवाचा मोठा मुलगा भरत,रामचंद्रचा भाऊ भरत,रहू राजाचा गुरु भरत हे तिन्ही भरत तुम्हीच बनले.सुखदेव(बाद्रायणी)तुम्हीच होते.तुम्हीच लोभषऋषी बनून अटल राहिलेत.असा लोभषऋषी तुम्हीच बनले.मुसलमानांचे चौवीस पीर ही तुम्हीच बनले. जैन लोकांचे चोवीस तीर्थंकर ही तुम्हीच बनले.पाप ही तुम्हीच आणि धर्म ही तुम्हीच आहात.मंत्र ही तुम्हीच आणि यज्ञ ही तुम्हीच आहात.मानव ही तुम्ही आणि केशव ही तुम्हीच.सारी करणी तुम्ही आहात.सारा विवेक ही तुम्हीच आहात.तसेच योगी ही तुम्हीच आहात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की मी सत्य सांगत आहे, तुम्ही ऐका,बेदंग म्हणजे वैद्य आणि वैद्यकिय पुस्तके ही तुम्हीच आहात. ।।५।।

मछ कछ वारा मोख ।। परस नरसिंघ प्रहलादु ।।
बावण बळ सुन बाल ।। जेत जोसी तुहि जादू ।।
दत्त व्यास गज दीन ।। हंस हंसा सर है ग्रीव ।।
बेद धनंतर बाण ।। सांम साहिब सुण सुग्रीव ।।
सनक सनन्दन स्याम तुं ।। नर नारायण नाँव ।।
के सुखदेव हरका बण्या ।। गण गंद्रप सुर गाँव ।।६।।

मच्छ ही तुम्हीच,कच्छ ही तुम्हीच आणि वराह आणि हिरणाक्ष ही तुम्हीच आहात. शंखासूर ही तुम्हीच,मोक्ष ही तुम्हीच.परशुरामजी ही तुम्हीच,सहस्त्रबाहु ही तुम्हीच नृसिंह ही तुम्हीच,हिरण्यकश्यप ही तुम्हीच आणि प्रल्हाद ही तुम्हीच,वामन ही तुम्हीच आणि बली(प्रल्हादचा नातू)ज्याला वामन अवतारने छळले,तो बली ही तुम्हीच आहात आणखी ही ऐका,बाली ज्याला रामचंद्र ने किष्किंधा मध्ये मारले तो बाली ही तुम्हीच, जयंत कौआ (इंद्राचा मुलगा)आणि जोशी ही तुम्हीच तसेच यादव(कृष्ण ही आणि जे छप्पन कोटी आपसात लढून मरून गेले)ते सर्व यादव ही तुम्हीच,दत्तात्रेय ही तुम्हीच आणि गज(ज्याला मगरमच्छ(मगरीने)पकडले होते)तो ही तुम्हीच आणि व्यास(कृष्ण व्दैपायन)ही तुम्हीच.दीन(गरीब)ही तुम्ही,हंस ही तुम्हीच आणि हंसासारही तुम्हीच. सांभ तुम्हीच होते आणि साहेब ही तुम्हीच आहात.आणखीही ऐका,सुग्रीव(वानर)ही (अंगधचा चुलत भाऊ)तुम्हीच होते.सनक,सनन्दन ही तुम्हीच आहात.श्याम ही तुम्हीच

आहात आणि नर नारायण ही तुम्हीच आहात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे सर्व हर म्हणजे ब्रम्ह पासूनच बनलेले होते.महादेवाचे गण गंदर्प(गंधर्व)आणि देव सर्व तुमच्या पासूनच बनलेले आहे. ।।६।।

रिषभदेव तुं राम ।। कपिल विद्या धर कुहाणो ।।
बुध्द निकलंक वळवंत ।। ग्यान होय प्रगट गवाणो ।।
भरथ पिरथ भगवान ।। चेत अवतार कहायो ।।
रमता तुहि सुखराम ।। आप बिन निजरन आयो ।।
परखु दिष्ट पसार ।। नेक दीसे नहिं न्यारो ।।
तुंहि तु तुं करतार ।। प्रगट हर आप पसारो ।।७।।

राम तुम्हीच ऋषभदेव आहे आणि कपिलमुनी(संख्याशास्त्रकर्ता)ही तुम्हीच,विद्याधर ही तुम्हीच म्हणवले.बुध्दी ही तुम्हीच आणि कलंकी अवतार ही तुम्हीच आहात. बळवंत ही तुम्हीच आणि ज्ञानी ही तुम्हीच म्हणवले.भरत(ज्याच्याने हा भरतखण्ड म्हणवला) पार्थ(अर्जुन)भगवान(श्रीकृष्ण)गीता सांगून अर्जुनला चतुर बनवणारा अवतार तुम्ही म्हणवले आणि तुम्हीच सर्वात रमण करून राहिले आहेत.तुमच्या अतिरीक्त कोणी ही नजरेत येत नाही.असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले.दृष्टी पसरवून पारखून बघतो,तर थोडेसेही तुमच्या शिवाय कोणी दुसरा कोठेही कोणीही दिसून येत नाही. (दिसत नाही) तुम्हीच कर्तार आहात.हा सारा प्रगट पसारा तुमचाच आहे. ।।७।।

आरब अला अतीत ।। तुरक हिंदु तुहि तत्त हे ।।
जुग बरण्या तुंहि जात ।। वैस करसो तुहि खत हे ।।
नर नारी तुहि नाँव ।। माय पुत्तर नर मेहेरी ।।
राजा तुंहि अमराव ।। सेस कौरू तुहिं स हरी ।।
परगट तुं द्रगपाल ।। कसब कोरू तुहिं क्काणो ।।
सरब समंद सुमेर ।। ज्याहाँ त्याँहा साहब जाणो ।।८।।

आरब(पालनकर्ता)अल्ला व अतीत ही तुम्हीच आहात.मुसलमान ही तुम्हीच आणि हिंदू ही तुम्हीच आहात.चारी वर्ण ही तुम्हीच आहात,वेग-वेगळ्या मनुष्यांच्या जाती ही तुम्हीच आहात.दस्तावेज लिहून घेणारे तुम्हीच आहात.राजाचा उमराव ही तुम्ही,शेष ही तुम्हीच आणि कौरव ही तुम्हीच,हरी ही तुम्हीच आहात.कश्यप आणि कौरव ही तुम्हीच आहात.सारा समुद्रही तुम्हीच आणि सुमेर(सोन्याचा पर्वत ही)तुम्हीच आहात.जेथे तेथे सर्वत्र साहेब म्हणजे सतस्वरूप ब्रम्हच आहे,असे मी जाणले. ।।८।।

प्रश्न ।।

थे किस्या राम ने गावो ।।

उत्तर ।। रेखता ।।

पाँच जिण तत्त बेराट ओ थरपियो ।। बिस्न ब्रम्हा हर पैदास कीया ।।
पीर अवतार सिव सगत के ऊपरे ।। दुज कूं ग्यान का मूळ दीया ।।
अलख अलेख अलाह खुदायसो ।। काळ हुणहार उण राम सारे ।।
पलक मे मांड नर नार सो थरपिया ।। छिनक में सब कूं मार डारे ।।
कागदां ऊपरे राम मंडे नहीं ।। मुख में जीभ पर नहिं आवे ।।
दास सुखराम प्रब्रम्ह ने रट रया ।। संत कोई सूरवाँ भेद पावे ।।९।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना कोणी विचारले,आपण कोणत्या रामाचे स्मरण करतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी त्याला उत्तर देवून सांगितले की,मी ज्या रामजीने आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वी हे पाच तत्व बनवले आहेत.तसेच तीन लोक चौदा भवना सोबत ब्रम्हचे तेरा लोकांचा बैराट स्थापन केला आहे.त्या रामजीला मी गातो मी ज्या रामजीने सतोगुणी विष्णु,रजोगुणी ब्रम्हा व तमोगुणी हर म्हणजे महादेवाला उत्पन्न केले व जो राम पीर,अवतार,शिव व शक्तीच्या वरती आहे.तसेच ज्या रामाने ब्रम्हाला चारी वेदांच्या ज्ञानाचे मूळ दिले आहे,त्या रामजीला भजतो.जो राम डोळ्यांनी दिसत नाही असा अलख आहे.कागदावर लिहिला जात नाही,असा अलेख आहे.अल्लाह आहे,ज्याला कोणी बनविले,अशा रामजीला मी गातो.ज्या रामजीच्या स्वाधीन काळ तसेच होनहार आहे,त्या रामजीला मी भजतो.ज्या रामजीने एका पळात सारी सृष्टी स्थापन केली व जो राम स्थापना केलेल्या सृष्टीला पळभरात मिटवू शकतो,असा जो राम आहे त्याला मी गातो.तो सतस्वरूप राम,रामनाम जिभेवर रटल्याने घटात ने अक्षर ध्वनिच्या रूपात प्रगट होतो.तो ने:अक्षर ध्वनि म्हणजे रामाचे नाव कागदावर लिहिले जात नाही.मुखाने जिभेवर घेतले जात नाही.म्हणजे बोलून सांगता येत नाही. अशा रामाला जगातील ज्ञानी,ध्यानी सतस्वरूप पारब्रम्ह सांगतात,त्याला मी रटून राहिलो आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जगात त्या रामाला प्रगट करण्याचा भेद विरळेच शूरवीर संत मिळतात.।।९।।

छंद प्रात भुजंगी ।।

नथो बाप मइया ।। नको बेन भइया ।।
नथो जात पांति ।। नको रंग भाँति ।।
नथो रूप रूपं ।। नकौ गृहे चूपं ।।
नथो देव सेवा ।। नको भोल भेवा ।।
अखंडी निजानाम ।। ब्रम्ह बिचारं ।।१।।

ज्या रामाचे मी भजन करतो,त्या रामाला आई वा बाप नव्हते.कोणी बहिण भाऊ ही नव्हते.त्याची जाती किंवा पाती ही नव्हती.त्याचा रंग किंवा कोणत्याही प्रकारचा नाही.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

त्या रामाचे रूप स्वरूप ही नव्हते.त्याचा कोणता ग्रह ही नाही आणि त्याला कोणत्याही देवाची सेवा ही नव्हती.तो राम भोळा ही नाही.तो राम अखंड निजनाम ब्रम्ह आहे.त्या नामाचा मी विचार करतो.।।१।।

जहाँ देस बासंग ।। नहिं तिस लारं ।।
बिना ब्रम्ह भगती ।। मिले सब छारं ।।
बिना रूप रूपं ।। बिना नेण निहारं ।।
धरे ध्यान सोई ।। युं ब्रम्ह बिचारं ।।२।।

जेथे देश किंवा वास वस्तू किंवा राहण्याचे स्थान त्याच्या सोबत काहीही नाही.त्या सतस्वरूप ब्रम्हची भक्ती शिवाय सर्व राखेत मिळेल.तो रूपाशिवाय अरूप आहे.त्याला मी बिना डोळ्यांनी पाहतो म्हणजे त्याचे ध्यान करतो.मी अशा ब्रम्हचा विचार करतो. ।।२।।

नथो हार जीतं ।। नको खाण दीपं ।।
नथो बन रोही ।। नको नग्र होई ।।
नथो देव मायं ।। नको देस कायं ।।
नथो राग वागं ।। नको मेल छाजं ।।
अखंडी निजानाम ।। ब्रम्ह बिचारं ।।३।।

त्याची हार ही झाली नाही आणि विजय ही झाला नाही.तो खाणीत येवून प्रकाशित ही झाला नाही.तो वनात जंगलातही नव्हता.तो नगर किंवा शहर,गावातही नव्हता.तो मायारूपी देव ही नव्हता.त्याचा कोणी एक देशही नव्हता,म्हणजे तो एकदेशी नाही आहे.त्याला काया(शरीर ही)नाही.राग,प्रीति ही नाही बाग(बगीचा)ही नाही आणि त्याचे महत्त्व किंवा लज्जा काहीही नाही.असा तो अखंड आहे.तो निजनाम ब्रम्ह म्हणजे सतस्वरूप ब्रम्ह आहे.त्याचा मी विचार करतो. ।।३।।

नथो जाम जाया ।। नको ग्रभ आया ।।
नथो त्याग त्यागी ।। नको पंच जागी ।।
नथो सूर होई ।। नको हीण कोई ।।
नथो जीव जीतं ।। नको ब्रद्धी बीतं ।।
अखंडी निजानांव ।। ब्रम्ह बिचारं ।।४।।

त्याने जन्म घेतला ही नव्हता आणि तो मातेच्या गर्भातही आला नाही आहे.त्याने त्याग ही केला नाही.तो वित्त(धनवान ही)नाही.तो पंच ही नाही,तो जागृत ही नाही.तो देव ही नाही,तो कोणी हीन ही नाही.तो जीव ही नाही,तो जीत ही नाही.तो बुध (बुद्धीमान ही नाही,तो वित्त(धनवान)ही नाही,तो अखंडी निजनाम असो सतस्वरूपी ब्रम्ह राम आहे.

त्याचा विचार म्हणजे सुमिरण,भजन मी करतो. ।।४।।

नथो जोग जोगी ।। नको गृह भोगी ।।
नथो खाख अंगा ।। नको पेर चंगा ।।
नथो बेण बोले ।। नको जुग डोले ।।
नथो हीण होई ।। नको ऊँच कोई ।।
अखंडी निजानावं ।। ब्रम्ह बिचारं ।।५।।

तो योगी ही नव्हता आणि भोगी ही नव्हता.तो गृहस्थी ही नव्हता.तो भोगी ही नव्हता. त्याने महादेवासारखी राख लावली नाही.त्याने चांगले कपडे ही घातले नाही.विष्णू बनून पितांबर,मुकुट,वैजंतीमाळा,शंख,चक्र,गदा,पद्म असे चांगले चांगले घातले ही नाही.तो बेण(वेद बोलणारा ब्रम्हा)ही नव्हता.संसारात डोलणारा नारद किंवा सनकादिक ही कोणी नव्हता.तो हीन ही नव्हता आणि उच्च ही कोणी नव्हता.तो अखंडी निजनाम असा सतस्वरूप ब्रम्ह आहे.त्या रामाचा मी असा विचार म्हणजे भजन सुमिरण (स्मरण)करतो.।।५।।

नथो बिरळ बाणी ।। नको मून ठाणी ।।
नथो बेद बाचं ।। नको जाय जाचं ।।
नथो अर्थ कीनं ।। नको भेद चीनं ।।
नथो मुढ होई ।। नको ग्यान कोई ।।
अखंडी निजानावं ।। ब्रम्ह बिचारं ।।६।।

तो बकबक करून वाणी ही बोलणारा नव्हता.तो मौन धारण करून कोणी मौन ही नव्हता.जड भरत आणि हस्तामल सारखा मौर धारण करणारा ही कोणी नाही.तो वेद वाचणारा वेदव्यास ही नव्हता.बलीच्याजवळ जावून याचना करणारा वामन ही नव्हता. याने काही अर्थ ही नाही केला,याने भेद ही नाही जाणला.तो मूढ(मूर्ख)ही बनला नाही. त्याला कोणते ज्ञान ही नव्हते.तो अखंडी निजनाम ब्रम्ह आहे.त्या रामाचे मी भजन, स्मरण करतो.।।६।।

नथो पाप पुनं ।। नको सेर सुनं ।।
नथो तेज तारं ।। नको निरट धारं ।।
नथो चाय चालं ।। नको केण पालं ।।
नथो बाल तरणा ।। नको क्वार परणा ।।
अखंडी निजानावं ।। ब्रम्ह बिचारं ।।७।।

तो पाप ही नव्हता आणि पुण्य ही नव्हता.तो शरीर ही नाही.सुन्न(उजाड)ही काही नाही. तो तेज(सूर्य)आणि तारे ही नव्हता.निरट(        )धार(धारण)करणारा ही नव्हता.त्याने

कोणती चाल ही नाही चालवली.त्याने काही म्हटले ही नाही आणि काही मना ही केले नाही.तो बालक(छोटा मुलगा)ही नव्हता आणि तरूण(जवान)ही नव्हता.तो(कुमार) अविवाहित ही नव्हता.त्याने आपला विवाह ही नाही केला.असे ते अखंडीत निजनाम आहे.त्या रामाचे मी भजन करतो.।।७।।

नथो ओथ पोथी ।। नको कंवळ जोती ।।
नथो रिष राया ।। नको करम काया ।।
नथो दिष्ट कोई ।। नको भूल होई ।।
कहे सुखरामं ।। धरो ध्यान सामं ।।
अखंडी निजानामं ।। ब्रम्ह बिचारं ।।८।।

ते ओत प्रोत एक दुसऱ्याशी मिळालेले ही नव्हते.ते कमळ किंवा ज्योती ही काही नव्हती.ते ऋषी वा कोणी राजा ही नव्हता.तो कर्म वा कोणी काया(शरीर)ही नव्हता. त्याच्या दृष्टीत कोणी येत ही नव्हते.त्याच्याने चूक ही कोणती झाली नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अशा स्वामीचे मी ध्यान करतो.ते अखंडी निजनाम आहे.त्या सतस्वरूप ब्रम्हचा विचार(भजन)करतो.।।८।।

कवित ।।

नहिं बाप अर माय ।। नहिं बेनर सुण भइया ।।
नहिं देस कुळ गाँव ।। नहिं किण सरण न रहिया ।।
नहिं ग्यान गुरू सिष ।। नहिं आपो तन काया ।।
नहिं वार कछु पार ।। नहिं कभु जाय न आया ।।
अेसा अदभुत राम है ।। जां कूं शिवंरू बीर ।।
तां कूं सुण सुखराम के ।। भजियो दास कबीर ।।९।।

मी ज्या रामजीला गातो,त्या रामजीला जगातील लोकांसारखे माता–पिता नाही.तसेच बहिण भाऊ नाही.त्याला जगाच्या स्त्री–पुरुषांसारखे कोणी कुळ,गाव तसेच देश नाही. त्या रामजीने जगातील स्त्री–पुरुषांसारखे कोणाचा आश्रय वा शरणा घेतला नाही.त्या रामजीला जगातील लोक जसे गुरु बनवतात तसा गुरु नाही.तसेच जगातील गुरु जसे शिष्य बनवतात तसे त्याला शिष्य ही नाही.त्याचे ज्ञान माया समजने समझेल असे नाही.त्याला कोणाशी काही आपलेपण नाही.तसेच कोणाशी वैरभाव नाही आहे.त्याला तीन लोक,चौदा भवनाच्या जीवांच्या काये सारखी काया नाही.तसेच जगातील ज्ञानी ज्ञानाने मायेचा तोलमोल वारपार घेतात तसा त्याचा कोणाशी तोलमोल,वारपार नाही घेता येत.तो अपार आहे.येथे जसे जगातील हंस मृत्युलोकातून तीन लोक चौदा भवनात कोठे ही जातात व तीन लोक चौदा भवनात मृत्यूलोकात जन्म घेवून येतात असा हा

राम तीन लोक चौदा भवनात जीवांसारखे कोठे जात नाही किंवा कोठून येत नाही.तो सर्वांमध्ये आदिपासून जसा भरला होता,तसाच अंत पर्यंत(शेवटपर्यंत)भरलेला राहतो. त्याला कोणत्याही मायेच्या वस्तूंसोबत तोलमोल जोडून सांगता येत नाही.असा तो अद्भूत आहे.असा जो राम काल ही होता.आज ही आहे व उद्या ही राहणार.अशी कधी वेळ नाही येणार की तो नाही राहणार अशा अद्भूत रामाचे मी स्मरण करतो.याच अद्भूत रामाला माझ्या आधी,पूर्ण काळात संत कबीरजींनी भजले.।।९।।

साखी ॥

मै मेरा शिंवरण करू ॥ मै मोकूं गाऊँ ॥
रमता बिन सुखराम के ॥ दुजो नहि ध्याऊँ ॥१॥

मी माझेच स्मरण करतो आणि मी माझेच भजन गातो.रमता म्हणजे रामाशिवाय दुसऱ्याला मी गात नाही.म्हणजे दुसऱ्यांचे भजन नाही करत.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१।।

॥ इति ब्रम्ह बिचार को अंग संपूरण ॥